# न्याय टाईम्स

संपादक : बालकिशन सोनी

Mob : 94231 68902

संभाजीनगर / नांदेड /परभणी / लातूर /बीड /बुधवार, दि. १४ मे २०२५ वर्ष १२ वे अंक ३६० पाने ६ किंमत २ रु.


## औषध खरेदी घोटाळ्यातील चौकशी प्रस्तावित असलेला औषधनिर्माता अजुनही औषधीभांडारात ठाण मांडून

नांदेड : जिल्हा परिषद औषधीभांडारातील कोट्यवधी रूपयांच्या औषध खरेदीत झालेल्या अनियमतेवर विभागीय चौकशी प्रस्तावित असतानाही, संबंधित मुख्य औषधनिर्माता प्रतापसिंह गिरासे यांच्याकडे अजूनही आर्थिक कार्यभार कायम ठेवून त्यांची बदली न करता त्यांना मोकळे रान देण्यात आले आहे. ही बाब केवळ प्रशासकीय दुर्लक्ष नव्हे, तर नियोजनबद्ध अभयधोरणाची स्पष्ट लक्षणे दर्शवते.आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या १३ मार्च २०२५ रोजीच्या पत्रानुसार, २०२२ ते २०२५ या कालावधीत झालेल्या औषध खरेदी व्यवहारांतील गंभीर अनियमिततेची विभागीय चौकशी आरोग्य उपसंचालक, लातूर यांच्यामार्फत प्रस्तावित करण्यात आली होती. त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांच्या कागदपत्रांची मागणी झाली असतानाही जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी ही माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन दिली नाही.सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, चौकशीच्या छायेत असलेल्या प्रतापसिंह गिरासे यांच्याकडे जिल्हा नियोजन अंतर्गत कोट्यवधींचा आर्थिक कार्यभार कायम ठेवण्यात आला आहे. यामुळे चौकशीसाठी आवश्यक पुरावे नष्ट होण्याचा, कागदपत्रात फेरफार होण्याचा किंवा संबंधित व्यक्तींवर दबाव टाकण्याचा धोका अत्यंत वाढलेला आहे.




KONALE
IIT-JEE CENTER
३० वर्षाचा विश्वास आणि यशाची परंपरा !

आपल्या सर्व विद्यार्थ्यांचे लाडके
कोनाळेसर यांच्या तर्फे
दहावीच्या यशश्वी विद्यार्थ्यांचे
हार्दिक अभिनंदन !


# राज्याचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के

## बीड जिल्ह्याचा सर्वाधिक ९६.४७ टक्के, तर यंदाही पोरांपेक्षा पोरी सरस

**बीड** (प्रतिनिधी) :-

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला. त्यानंतर दुपारी १ वाजता ऑनलाईन पद्धतीनं निकालाची गुणपत्रिका विद्यार्थ्यांना पाहता येणार आहे. विद्यार्थ्यांना मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळांवर ऑनलाईन पद्धतीनं निकाल पाहता येतील, असं मंडळाचे सचिव देविदास



कुलाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केलेलं.यंदा राज्याचा दहावीचा निकाल ९४.१० टक्के लागला आहे. यंदाही कोकण विभाग अव्वल असून यंदा दहावीच्या निकालात नागपूर विभाग तळाला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मुलींनी निकालात बाजी मारली असून उत्तीर्ण झालेल्यी मुलींची टक्केवारी ९६.१४ अशी आहे, तर मुलांची टक्केवारी ९२.२१ अशी आहे.

# पंकजा मुंडेंचा ऐतिहासिक निर्णय

## पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या आता होणार समुपदेशनाने

**मुंबई । प्रतिनिधी**

**मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा व बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा मुंडे यांनी घेतला आहे.**



ऐतिहासिक निर्णय राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही दि. १५ व १६ मे २०२५ रोजी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान सुमारे ६५० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत.पशुसंवर्धन विभाग व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना केल्यानंतर काही नवीन पदे निर्माण ◀◀ पान २ वर

## पिकविमा मिळाला नाही अशा शेतकऱ्यांनी १५ मे पर्यंत कृषी विभागाकडे तक्रारी अर्ज दाखल करावेत -आ. रमेशआप्पा कराड

**लातूर** (प्रतिनिधी) :-

खरीप पिक विमा २०२४ अंतर्गत पीक नुकसानीची सूचना देऊनही पिकविमा मिळाला नाही. अशा शेतकऱ्यांनी येत्या दि.१५ मे २०२५ पर्यंत तालुका कृषी कार्यालयात तक्रारी अर्ज दाखल करावेत असे आवाहन लातूर ग्रामीणचे आ रमेशआप्पा कराड यांनी केले आहे. यातक्रारी अर्जामुळे तक्रारीचे निवारण करणे शक्य होईल असे बोलून दाखवले.



खरीप पिक विमा सन २०२४ अंतर्गत पिकविमा काढलेल्या शेतकरी लाभार्थींना पूर्वसूचना पिक विमा कंपनीकडून विविध कारणास्तव नाकारण्यात आला आहे. अनेक शेतकऱ्यांना खरीप हंगामातील पिक विमा मिळाला नसल्यामुळे लातूर ग्रामीण मतदार संघातील शेतकऱ्यात मोठ्या प्रमाणात नाराजी पसरली आहे. दरम्यान शेतकऱ्याच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी तालुकास्तरीय मा. तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली असून ही समिती शेतकऱ्यांचे अर्ज स्विकारणार आहेत.

. पिक विमा तक्रारीबाबत विशेष शिबीर आयोजित करुन शेतकऱ्यांकडून तक्रारी स्विकाराव्यात व प्राप्त तक्रारींची पडताळणी करुन तालुकास्तरीय समितीने योग्य तो निर्णय घ्यावा व संबंधितांस माहिती द्यावी अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत असे सांगून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, पिक विमा नुकसान भरपाई पासून वंचित असलेल्या लातूर ग्रामीण मतदार संघातील शेतकऱ्यांनी आपला तक्रारी अर्ज १५ मे २०२५ पर्यंत तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे सादर करावेत जेणेकरून तक्रारीचे निवारण करणे शक्य होईल असे बोलून दाखवले आहे.

## ८९.६०% गुण मिळवत योगिता गिरी हिचे दहावीत घवघवीत यश

**परळी** (प्रतिनिधी) :-



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (डडउ) परीक्षेत परळी वैजनाथ येथील लिट्ल प्लॉवर हायस्कुलची विद्यार्थिनी कु.योगिता हनुमान गिरी हिने ८९.६०% गुण मिळवत प्रथम येवून घवघवीत यश संपादन केले आहे.

योगिताच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. ती लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार असून तिने विविध स्पर्धा परीक्षांमध्येही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिच्या या यशामागे तिची चिकाटी, मेहनत, पालकांचे मार्गदर्शन व शिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याचे सांगण्यात येत आहे. लिट्ल प्लॉवर इंग्लिश स्कुलचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांनी योगिताचे अभिनंदन करत तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सोन्याचे आमीष दाखवुन खिशातील पन्नास हजार रूपये जबरीने काढून घेतले

**गंगाखेड** (प्रतिनिधी) :-

परळी राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या दत्तवाडी तांडा कॅनल रस्त्यावर फिर्यादी नदाफ अफसर व त्याच्या दोन मित्राना सोन्याचे आमीष दाखवून सोने न देता तलवार आणि काठ्याचा हल्ला करून खिशातून पन्नास हजार रूपये बळजबरीने काढून घेतले.पोलीसाना घटना सांगताच पोलीस घटनास्थळी आले.पोलीसाना पाहुन आरोपी पळून जात होते.दरम्यान पोलीसानी आरोपीचा पाठलाग करून तिघांना पकडले.तीनजण पसार झाले.ही घटना दि.११ मे रोजी ५ वाजण्यासुमारास घडली.नदाफ अफसर राहणार वसमत याच्या तक्रारीवरून सहा जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

हिंगोली जिल्हातील वसमत येथे राहणारा नदाफ अफसर हा वसमत येथील किराणा दुकानावर नौकरी करतो.यास अज्ञात ग्राहकाने त्याच्या मोबाईलवरून घरी फोन करून किराणा सामान काय आणायचे असे म्हणत मोबाईल केला.त्यानंतर संध्याकाळी अज्ञात व्यक्तीने चार तोळे सोने असुन आमची दवाखान्याची अडचण आहे म्हणून विक्री करायचे असे सांगितले.सोन्याचा सौदा करण्यासाठी व सोने खरे आहे का हे पाहण्यासाठी नदाफ अफसर हा गंगाखेड ते परळी रोडवरील दत्तवाडी तांडा रस्त्यावर आला. सोन्याची खात्री पटल्याने त्याने पैशाचा जोड लावुन चार चाकी वाहनाने दत्तवाडी तांडा रस्त्यावरील कॅनलच्या कच्चा मार्गावर वाहन थांबवले.नदाफ याने कारमध्ये परभणीचे दोन मित्र मतीन, एजाज सोबत होते.यावेळी एक इसम आणि एका महिलेने त्याना सोने घेण्यासाठी पैशे आणले का असे विचारले.सोन्याचे बारीक शिक्के व अगठ्या दाखवत असताना अचानक शेत शिवारातुन चौघेजण फिर्यादीकडे आले.एकाच्या हातात तलवार आणि काठ्या होत्या. त्यानी तलवारीचा धाक दाखवून काठ्याने हल्ला केला.






## यश निलेश सोनीचे दहावी परीक्षेत घवघवीत यश

**परळी** (प्रतिनिधी) :-

यश निलेश सोनी याला 10th CBSE Board मध्ये ८०.६% गुण मिळाल्यामुळे सर्वत्र त्याचे अभिनंदन होत आहे. यश निलेश सोनी हा राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल, लातूर येथून ८०.६% गुण घेऊन उत्तीर्ण झाला असून, पुढील आयुष्यात त्याला IIT Engineer होण्याची इच्छा आहे. अमोरा गर्ल्स हॉस्टेल येथे त्याचे आजोबा डॉ. हरिकिशन सोनी, वडील निलेश सोनी, आई राधिका सोनी, अश्विनी लकडे, जाधव मॅडम, नामदेव राऊत, सिद्धेश्वर सूर्यवंशी यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## राजकीशोर पापा मोदी यांची आदर्श नागरी व आदर्श मल्टी स्टेट सहकारी पतसंस्थेस सदिच्छा भेट

**परळी** (प्रतिनिधी) :-

येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेला व आदर्श मल्टी स्टेट सहकारी पत संस्था स पीपल्स को बँकेचे चेअरमन तथा अंबाजोगाई नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष राजकीशोर पापा मोदी यांनी सदिच्छा भेट दिली.



पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी त्यांनी सहकारी चळवळीच्या महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकला आणि संस्थेच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मुंबईचे उपाध्यक्ष एडवोकेट विष्णुपंत सोळुंके , श्री . चंद्रशेखर समशेट्टी माजी नगर सेवक तसेच पतसंस्थेचे व्यवस्थापक शिवलिंग आप्पा मरळे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. या प्रसंगी संस्थेच्या भविष्यातील योजनांबाबत चर्चा करण्यात आली. सामाजिक विकास आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने संस्थेचे कार्य अधिक व्यापक करण्याचा संकल्प संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी राजकिशोर मोदी यांनी संस्थेच्या कारभाराबद्दल समाधान व्यक्त करून संस्थेने केलेल्या सत्कार बद्दल आभार व्यक्त केले पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### दहावीच्या निकालात दहिफळच्या


## लेकीचा महाराष्ट्रात डंका

सारणी । प्रतिनिधी

केज तालुक्यात दहिफळ (वड) येथील मुलगी आपल्या वडिलांच्या नोकरीमुळे धाराशिव येथे शिक्षण घेत आहे. तीने दहावी ला १००% पैकी १००% गुण मिळवत बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



दहिफळ वड (जि.बीड) येथील हिरामन मोराळे हे शिक्षक असून ते सध्या धाराशिव जिल्ह्यात ज्ञानदानाचे कर्तव्य करत आहेत. त्यामुळे आपल्या मुलांचे शिक्षण धाराशिव येथेच घेत आहेत. त्यांची मुलगी हर्षदा ही अभिनव इंग्लिश स्कुल येथे शिक्षण घेत आहे. यावर्षी ती दहावीला होती तिने १००% पैकी १००% गुण मिळवत आपल्या शाळेचे नाव उज्वल तर केलेच परंतु त्याचबरोबर बीड जिल्ह्याचेही नाव उज्वल केले आहे.

# नांदेड येथे अखिल भारतीय जिवा सेनेच्या रौप्य महोत्सव दिनानिमित्त पुरस्कार वितरण सोहळा

**लोहा (प्रतिनिधी) :-**

**राष्ट्रसंत श्री सेना महाराज सभागृह नवीन कौठा, नांदेड येथे दिनांक १४ मे २०२५ रोज बुधवारी अखिल भारतीय जिवा सेनेचा २५ वा वर्धापन दिन सोहळा संपन्न होणार आहे. या वर्धापन सोहळ्याचे उद्घाटक म्हणून नांदेड दक्षिणचे लोकप्रिय आमदार आनंदराव बोंढारकर हे उपस्थित राहणार आहेत. तसेच मार्गदर्शक म्हणून भारतीय पिछडा शोषीत संघ (इझडड) या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. जी. माचनवार, अ.भा.जीवा सेनेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष राजकुमार गाजरे, वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष गोविंद दळवी, नांदेडचे सामाजिक कार्यकर्ते प्रा. गौतम दुथडे, तसेच अखिल भारतीय जिवा सेनेचे राष्ट्रीय सचिव डॉ. प्रा. दत्ता कुंचेलवाड उपस्थित राहणार आहेत. या वर्धापन सोहळ्याचे अध्यक्ष म्हणून अखिल भारतीय जिवा सेनेचे संस्थापक अध्यक्ष संजय गुरधाळकर उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून गोविंद पिंपळगावकर राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश महाले, प्रा. लक्ष्मण कोंडावार, इंजि. लक्ष्मणराव लिंगापुरे, साहेबराव शेळके, अक्षय कुमार ढोके, गंगाधर जाकारे, गंगाधर मानसकरगेकर, नवनाथ घोडके, मिनाक्षीताई भदाणे, रंजनाताई वनफोडे, मीनाताई धुळेकर हे सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.**

वर्धापन दिन सोहळ्याच्या निमित्ताने समाजातील दोन महान व्यक्तिमत्त्वांचा संघटनेतर्फे वीर जिवाजी महाले पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. त्यापैकी एक म्हणजे कै. माजी खासदार भाई केशवरावजी धोंडगे साहेब यांना मरणोत्तर जिवाजी महाले पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती चंद्रप्रभावती केशवरावजी धोंडगे या उपस्थित राहणार आहेत. तसेच त्यांचे पुत्र मुक्तेश्वररावजी धोंडगे, प्रा. डॉ. पुरुषोत्तमजी धोंडगे तसेच मुलगी प्रा. डॉ. चित्राताई लुंगारे व परिवारातील अन्य सदस्यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच दुसरा पुरस्कार नाभिक समाजाचे एक महान लेखक, कवी तथा गोंडर कादंबरीकार अशोक कुबडे यांना संघटनेतर्फे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

समाजाला परिवर्तनाची दिशा देण्यासाठी तसेच शाहू फुले आंबेडकर या महापुरुषांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी मागील २५ वर्षांपूर्वी एका परिवर्तनशील विचारधारा असलेल्या क्रांतिकारी संघटनेची स्थापना करण्यात आली होती. ही क्रांतिकारी संघटना म्हणजे अखिल भारतीय जिवा सेना होय या क्रांतीकारी संघटनेची स्थापना प्रा. संजय गुरधाळकर संस्थापक अध्यक्ष व प्रा. राजकुमार गाजरे राष्ट्रीय कार्याध्यक्ष यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन केली होती. सध्या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंद पिंपळगावकर व राष्ट्रीय सचिव प्रा. दत्ता कुंचलवाड आहेत, तर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दिनेश महाले व प्रदेश सचिव म्हणून साहेबराव शेळके कार्यरत आहेत. तसेच संघटनेचे कर्मचारी महासंघाचे प्रदेश अध्यक्ष म्हणून प्रा. लक्ष्मण कोंडावार व कर्मचारी प्रदेश सचिव म्हणून इंजि. लक्ष्मणराय लिंगापुरे हे कार्यरत आहेत, महिला प्रदेश अध्यक्षा म्हणून मीनाक्षीताई भदाणे कार्यरत आहेत. या संघटनेची स्थापना होऊन आज पंचेवीस वर्षे पूर्ण झाली आहेत. म्हणून १४ मे रोजी संघटनेचा रौप्य महोत्सव दिन राष्ट्रसंत श्री सेना महाराज सभागृह नवीन कौठा, नांदेड येथे संपन्न होणार आहे. आजतागायत संघटनेच्या माध्यमातून अनेक क्षेत्रांमध्ये सामाजिक कार्य करण्यात आले आहे. वीरभाई कोतवाल आत्मसमान योजनेच्या माध्यमातून समाजातील गरीब निराधार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून त्यांना शैक्षणिक आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बहुजन समाजातील जवळपास ५० कर्तृत्वान महिलांचा संघटनेतर्फे पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आलेला आहे. नाभिक समाजातील महापुरुषांचा खरा इतिहास लोकापर्यंत पोहोचण्याचे महत्वाचे कार्य संघटनेच्या माध्यमातून करण्यात आले आहे. संघटनेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील अनेक शहरांमध्ये विर जिवाजी महाले यांच्या नावाने चौक, पुतळा, शिल्प, मार्ग, पुस्तके तसेच पोस्टाचे विशेष आवरण काढून वीर जिवाजी महाले यांच्या कर्तुत्वाला अभिवादन करण्यात आले आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रतापगडावरील वीर जिवाजी महाले यांचें पूर्णाकृती पुतळ्यानीशी स्मारक व्हावे यासाठी संघटना मागील २० वर्षापासून शासनदरबारी पाठपुरावा करत आहे. आज पर्यंत संघटनेच्या वतीने अनेक वेळा उपोषणे थालीनाद, घंटानादआंदोलने केली गेली आहेत. अजूनही शासनदरबारी पाठपुरावा चालूच आहे. अनेक ठिकाणी नाभिक व बहुजन समाजातील बंधू आणि भगिनीवर उच्चभ्रू य प्रस्थापित समाजाकडून वेळोवेळी होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवत त्यांना न्याय देण्यासाठी कृतिशील पद्धतीने या संघटनेच्या वतीने लढा दिला गेला आहे.

अशा या क्रांतिकारी संघटनेचा २५ वा वर्धापन दिन रौप्य महोत्सव सोहळा नांदेड येथे १४ मे रोजी श्री संत सेना महाराज सभागृह नवीन कौठा नांदेड येथे संपन्न होत आहे. या सोहळ्यासाठी महाराष्ट्रातील संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व समाज बंधु आणि भगिनींना निमंत्रित करण्यात येत आहे. तरी बहुसंख्येने या कार्यक्रमासाठी समाज बंधू आणि भगिनींनी उपस्थित राहाचे असे आवाहन अखिल भारतीय जीवा सेना नांदेड कार्यकारिणीच्या वतीने तथा नांदेड जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब पवार व युवा नांदेड जिल्हा अध्यक्ष श्याम जाधव यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# पुरोगामी विचारांचा नव 'केतन' विवाह सोहळा, देशमुख कुटुंबाचा पारंपरिक विवाह पद्धतीला पूर्णविराम!

**मुदखेड (प्रतिनिधी) :-**



बारड येथील केदारनाथ देशमुख यांच्या कुटुंबाने संपूर्ण पारंपरिक विवाह पद्धतीला पूर्णविराम देत सुपुत्र केतन यांचा शिव विवाह करून पुरोगामी विचारांचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. देशमुख परिवाराने कर्मकांड आणि वैदिक पद्धतीच्या विवाहास फाटा दिल्याने परिवर्तनाच्या प्रवासाला सुरुवात केली असून विवाह सोहळा नव'केतन' ठरला आहे.

बारड (ता. मुदखेड) येथील सेवा सहकारी सोसायटीचे माजी अध्यक्ष बांधिलकीने प्रेरित असलेले केदारनाथ वामनराव देशमुख यांचे सुपुत्र केतन देशमुख यांचा विवाह मौजे वापटी (ता. वसमत) येथील जनकराव शिंदे यांची कन्या चि. संध्या यांच्याशी नुकताच पार पडला आहे. प्रचलित व पारंपरिक पद्धतीच्या विवाह पद्धतीला फाटा देत साम्यवादी विचारसरणीचे दीपस्तंभ कार्ल मार्क्स यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिव धर्म पद्धतीने विवाह करण्यात आला. मुळपत्रिकेसोबत देशमुख परिवाराने भेट वस्तू म्हणून 'गोविंद पानसरे' यांचे 'शिवाजी कोन होता' पुस्तक भेट देऊन नवीन पायंडा पाडला आहे.

विवाह सोहळ्यात राजमाता जिजाबाई, छ. शिवाजी महाराज, कार्ल मार्क्स, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. जिजाऊ वंदना, संविधान प्रस्ताविकेसोबत शिवधर्म गाथेतील शिवसप्तकाने विवाह सोहळा पार पडला. तांदूळ व ज्वारीच्या अक्षदा टाळून फुलांचा अक्षदारुपी वापर करण्यात आला. मराठा समाजातील पारंपारिक रूढी, परंपरांना तिलांजली देत साध्या पद्धतीने विवाह सोहळा पार पडला आहे.सध्याच्या विवाह सोहळ्यात अवाजवी खर्च आणि संपत्तीचे प्रदर्शन दिसून येते. आज साध्या आणि पुरोगामी विचारांच्या विवाह सोहळ्याची आवश्यकता आहे. मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व शरद पाटलांच्या विचारांची कास धरत गुलामगिरीतून मुक्त होत परिवर्तनाच्या प्रवासाला सुरुवात या विवाह सोहळ्याच्या माध्यमातून करीत आहोत असे मत देशमुख परिवाराने यावेळी व्यक्त केले आहे.




# सुंडगी येथे बुद्ध जयंती साजरी

देगलूर : जगाला शांतीचा संदेश देणारे व करुनेचा सागर तथागत गौतम बुद्ध यांची देगलूर तालुक्यातील मौजे सुंडगी येथील बौद्ध समाज मंदिर येथे बौद्ध पौर्णिमा निमित्त बुद्ध जयंती साजरी करण्यात आली यावेळी त्रिशरण पंचशील घेऊन अभिवादन करण्यात आले यावेळी प्रकाश कांबळे यांच्या वतीने खीर दान देण्यात आले यावेळी ईरवंत कां बळे, गंगाराम कांबळे,हनमंत कांबळे, रंजीत लालू कांबळे ग्रामपंचायत सदस्य, रामा कांबळे,गंगाधर सुंडगीकर, प्रशांत कांबळे,प्रकाश कांबळे, यावेळी बौद्ध समाजातील सर्व उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# कामगारांच्या मुलांच्या शिष्यवृत्तीसाठी कामगार कार्यालयाकडून उडवा उडवीची उत्तरे, अजित पवार गटाचा आंदोलनाचा इशारा

**हिंगोली (प्रतिनिधी) :-**



हिंगोली जिल्ह्यात कामगारांच्या मुलांना दिला जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी कामगार कार्यालयाकडून टाळाटाळ केली जात असून याबाबत विचारणा करणाऱ्या कामगारांना उडवा उडवीची उत्तरे दिली जात आहेत या प्रकारामुळे आता राष्ट्रवादीचे अजित पवार गटाचे युवक जिल्हा उपाध्यक्ष संतोष आमले यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे

जिल्ह्यात कामगार कार्यालयाकडे नोंदणी केलेल्या कामगारांच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते शिष्यवृत्तीसाठी अनेक विद्यार्थ्यांनी मागील सहा सात महिन्यांपासून नोंदणी केली आहे मात्र अद्यापही या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळालीच नाही या प्रकारामुळे कामगार व विद्यार्थ्यांमधून तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या संदर्भात काही विद्यार्थी व पालकांनी कामगार कार्यालयाच्या संबंधित कर्मचाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांच्याकडून मात्र उडवा उडवीची उत्तरे दिली जाऊ लागली आहे आपल्याकडे कळमनुरी तालुक्याचा केवळ दोनच दिवस पदभार असून आपली त्या ठिकाणी कायम नियुक्ती नसल्याचे सांगितले जात आहे तसेच ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर जेष्ठता क्रमांकानुसारच शिष्यवृत्ती अदा केली जात असल्याचे सांगितले जात आहे. दुसरीकडे कळमनुरी तालुक्यात मात्र शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी दलालांचा सुळसुळाट निर्माण झाला असून विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक करून शिष्यवृत्ती मिळवून देण्याचे आमिष दाखविले केले जात आहे. शिष्यवृत्ती बाबत दलाल व कर्मचाऱ्यांचे मिली भगत सुरू असल्याचा आरोप पालकांमधून केला जात आहे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतरही शिष्यवृत्ती का अदा केली नाही असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे युवक जिल्हा उपाध्यक्ष संतोष आमले यांनी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती कळमनुरी तालुक्यात तातडीने द्यावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे

# पीक विमा न मिळालेल्या शेतकऱ्यांसाठी संधी; १५ मे पर्यंत तक्रार अर्ज सादर करण्याचे धिरज देशमुख यांचे आवाहन

लातूर: सन २०२४ मधील खरीप पीक विमाधारक शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाची संधी उपलब्ध झाली आहे. ज्या शेतकऱ्यांनी पीक नुकसानीची पूर्वसूचना देऊनही त्यांना पीक विम्याचा लाभ मिळालेला नाही, अशा शेतकऱ्यांसाठी तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. लातूर जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार ही समिती शेतकऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करणार आहे.

लातूर, रेणापूर, औसा व इतर तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळालेला नाही, त्यांनी आपले तक्रारी अर्ज आवश्यक माहितीसह दिनांक १५ मे २०२५ पर्यंत संबंधित तालुक्याच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केले आहे. खरीप हंगामातील नुकसानीची पूर्वसूचना देऊनही ज्या शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळालेली नाही, त्यांच्यासाठी ही समिती एक महत्त्वपूर्ण माध्यम ठरणार आहे. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन धिरज देशमुख यांनी केले आहे.

# सावित्रीबाई माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

## कु.पूनम शिंपाळे प्रथम तर शुभांगी चव्हाण, पूजा बगडे द्वितीय

**देगलूर (प्रतिनिधी) :-**


कु. शिंपाळे पूनम (89%)


कु. शुभांगी चव्हाण (88.20%)


कु.पुजा बगडे (88.20%)

शहरातील नामांकित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय देगलूर,या विद्यालयाचा निकाल दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी उल्लेखनीय लागल्याने दहावीच्या परीक्षेत पुन्हा सावित्रीबाई फुले विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली.सदरिल विद्यालयात सेमी व मराठी असे दोन वर्ग चालतात शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये दोन्ही वर्गातुन एकूण ११० विद्यार्थी परिक्षेस बसलेले होते. त्यापैकी १०० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.कु. पूनम शिंपाळे (८९%), कु. शुभांगी चव्हाण (८८. २०%), कु. पूजा बगडे (८८.२०%) यांच्यासह शाळेतील सेमी तुकडीचा निकाल हा १००% असून, विशेष प्राविण्य मिळवणारे १५ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीतील ३६ आणि व्दितीय श्रेणीमध्ये ३४ विद्यार्थी व पास विद्यार्थी १४ यशस्वी झाले असून शाळेचा निकाल हा ९०.९०% लागला आहे.या यशाबद्दल लोकहित शिक्षण संस्थेचे,अध्यक्ष श्री राजाराम कहाळेकर ,संस्थेचे सचिव अँड.जयवंत गजभारे , माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री यशवंत गजभारे , प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री किशन पाटील तसेच शाळेतील सर्व शिक्षक,शिक्षिका व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तसेच दहावीच्या श्री. सोमूरे व्हि. एस व श्री चिद्रावार ए. ए तसेच परीक्षा प्रमुख विशाल पवार यांच्या सह दोन्ही वर्गाचे वर्ग शिक्षक तसेच सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले त्याबद्दल संस्थेकडून अभिनंदन करण्यात आले.

# सामाजिक कार्यकर्ते तथा पैनगंगा मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर तावडे यांना पी.एच डी प्रदान

**नांदेड (प्रतिनिधी) :-**




सामाजिक आणि उद्योग क्षेत्रात नाविन्यपूर्ण व प्रशंसनीय कार्य केल्या बद्दल अमेरिकेतील कोलंबिया ( कॅलिफोर्निया) विद्यापीठाची मानद डॉक्टरेट पदवी कार्यकर्ते तथा पैनगंगा मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष कमल किशोर तावडे यांना डायरेक्ट पदवी देण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील तळणी सारख्या ग्रामीण भागातून शिक्षण घेत सहकार क्षेत्रात काम करत व सामाजिक बांधिलकी जपत सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक कमलकिशोर तावडे हे गेल्या पंधरा वर्षा पासून सहकार क्षेत्रात काम करत आहेत.शहरापासून दूर असणाऱ्या तळणी सारख्या खेडे गावात एका शेतकरी कुटुंबात डॉ.कमलकिशोर तावडे यांचा जन्म झाला. तळणी याठिकाणी प्राथमिक शिक्षण आणि नंतर हदगाव व नांदेड याठिकाणी महाविद्यालयीन शिक्षण घेऊन, कमलकिशोर तावडे यांनी पैनगंगा मल्टीस्टेट बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात आपली वाटचाल सुरू केली.दरम्यान सहकार क्षेत्रात काम करत असताना ग्रामीण भागातील खेड्यापाड्याची नाळ असणाऱ्या कमलकिशोर यांच्या पैनगंगा मल्टीस्टेट बँकेच्या जवळपास पंधरा शाखा आज मराठवाड्यात उत्तम रित्या कार्य करत असताना पहायला मिळतात.या माध्यमातून डॉ. कमलकिशोर तावडे यांनी सामाजिक भान ठेवत खेड्यापाड्यातील छोटेमोठे उद्योग, शेतकरी समूह, बचत गट, सुशिक्षित बेरोजगारांना,कुटीर उद्योगांना, अर्थसहाय्य करत स्वतः च्या पायावर उभे राहण्यासाठी मदत केली.दरम्यान त्यांच्या या कामाची दखल समता प्रतिष्ठान दिल्लीने घेतली. त्यानुसार त्यांना सामाजिक क्षेत्रात, सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल आयकॉन पुरस्कार देऊन गौरविण्यात आल.तर उद्योग आणि सहकार क्षेत्रातील उत्कृत योगदाना बद्दल अमेरिकेच्या कॅलिफोर्निया विद्यापीठाची पीएचडी पदवी त्यांना बहाल करण्यात आलीय.सामाजिक कार्यकर्ते तथा पैनगंगा मल्टीस्टेट बँकेचे अध्यक्ष कमलकिशोर तावडे यांना काल ११ मे २०२५ रोजी मालवीय स्मृती भवन, नवी दिली याठिकाणी अशोकस्तंभाचे सन्मान चिन्ह आणि पपी.एच डी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.सामाजिक आणि उद्योग क्षेत्रात नाविन्यपूर्ण व प्रशंसनीय कार्य केल्या बद्दल अमेरिकेतील कोलंबिया ( कॅलिफोर्निया) विद्यापीठाने ही मानद डॉक्टरेट डॉ.कमलकिशोर तावडे यांना बहाल केलीय.



# न्याय टाईम्स



## ९८ टक्के गुण घेऊन मंथन लक्ष्मीनारायण मंत्री याचे दहावीत घवघवीत यश

**परळी** (प्रतिनिधी) :-

इयत्ता दहावीच्या परीक्षेत चि. मंथन लक्ष्मीनारायण मंत्री याने ९८% गुण घेऊन न्यू हायस्कूल शाळेतून द्वितीय येण्याचा मान पटकावला.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (डडउ) परीक्षेत परळी वैजनाथ येथील न्यू हायस्कूलचा विद्यार्थी याने ९८ टक्के गुण मिळवत घवघवीत यश संपादन केले आहे.चि. मंथनच्या यशाबद्दल सर्वस्तरांतून त्याचे कौतुक होत आहे. पालकांचे व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असल्याचे त्याने सांगितले. न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदांनी अभिनंदन करत पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# कामगारांच्या न्यायासाठीचा संघर्ष मजबूत करण्यासाठी योगदान द्या - कॉम्रेड रोहिदास जाधव

## सीटूचा परळीत आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने मेळावा संपन्न!

**परळी** (प्रतिनिधी) :-

**कामगारांचे हक्क आणि अधिकार त्यांना मिळावेत. त्यांना योग्य वेतन आणि सुरक्षा मिळावी. यासाठी सिटू संघटनेच्या वतीने चाललेल्या कामगारांच्या न्यायासाठीचे संघर्ष मजबूत करण्यासाठी कामगारांनीच आंदोलनात सामील होऊन योगदान द्यावे, असे आवाहन कॉम्रेड रोहिदास जाधव यांनी केले.**

सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू) या राष्ट्रीय कामगार संघटनेच्या वतीने आज दिनांक १ मे रोजी परळीत कामगार मेळावा संपन्न झाला. या मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी एसएफआयचे राज्य सरचिटणीस आणि अर्थशास्त्र विषयाचे संशोधक कॉम्रेड रोहिदास जाधव हे बोलत होते. आंतरराष्ट्रीय कामगार आणि महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याची सुरुवात ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते कॉम्रेड पी. एस. घाडगे सर यांच्याहस्ते श्रमिकांच्या लाल झेंड्याचे ध्वज फडकावून करण्यात आली. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सीटूचे जिल्हा अध्यक्ष प्रा. बी. जी. खाडे हे होते तर





जेष्ठ नेते प्रा. प्रभाकर नागरगोजे, कॉम्रेड किरण सावजी, जालिंदर गिरी, सुवर्णाताई रेवले यांनी सुद्धा मेळाव्यास मार्गदर्शन केले.पुढे बोलताना कॉम्रेड रोहिदास जाधव म्हणाले की, 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन हा कामगारांची मेहनत, कष्ट, जिद्द आणि चिकाटीला सलाम आणि सन्मान करण्याचा दिवस असतो. कामगारांना आज नव्याने एकजूट होण्याची आवश्यकता आहे. कामगार अनेक समस्यांचा सामना करत आहे. त्यांना योग्य वेतन मिळत नाही, त्यांच्या कामाची हमी नाही, असे असताना संघटना बांधण्याच्या स्वातंत्र्यावर आता गदा आणली जात आहे. लोकशाहीविरोधी जनसुरक्षा विधेयक त्याचेच उदाहरण आहे. प्रचंड वाढलेल्या खाजगीकरणामुळे कामगारांसह सर्वच नोकरीचे क्षेत्र धोक्यात आले आहे. असे असताना भाजपच्या नेतृत्वाखालील मोदीचे सरकार जाती-धर्माच्या नावावर लोकांना भडकवण्यात मग्न आहे. आरएसएस आणि भाजप जनतेत फूट पाडून द्वेष पसरवत आहे. हे धर्मांध संकट सुद्धा रोखण्याची तयारी कामगारांना करावी लागेल. म्हणून कामगारांच्या पाल्यांनी धर्मनिरपेक्ष, समाजवादी, लोकशाहीवादी व पुरोगामी विचाराच्या स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) या विद्यार्थी संघटनेत सामील होण्याचे आवाहन त्यांनी केले.सीटूचे जिल्हा अध्यक्ष प्रा. बी. जी. खाडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'कामगारांनी सजग बनले पाहिजे. खरे काय अन् खोटे काय हे आपल्याला कळलं पाहिजे. आपल्याला भाजपकडून खोटा इतिहास सांगितला जातो. इतिहासाला मोडून तोडून मांडण्याचा प्रयत्न होतो. परंतु जे वास्तव आहे, जे खरे आहे, ते आपण सर्वांनी समोर आणले पाहिजे. आज कामगारांच्या समस्यांकडे भाजप सरकार दुर्लक्ष करत आहे. सीटू आयोजित या मेळाव्याचे प्रास्ताविक जावेद शेख यांनी केले; तर सूत्रसंचालन प्रकाश वाघमारे यांनी केले. आभार कॉम्रेड किरण सावजी यांनी मानले. मेळाव्यास परळी शहर आणि तालुक्यातील कामगारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. 'जगातील कामगारांनो एक व्हा', 'जागतिक कामगार दिन जिंदाबाद', 'महाराष्ट्र दिन चिरायू होवो', 'इन्कलाब जिंदाबाद', 'लाल बावटा जिंदाबाद' या घोषणांनी मेळाव्याचा समारोप झाला.

## जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९७%

**अंबाजोगाई** (प्रतिनिधी) :-

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शालांत परीक्षेचा निकाल ९७ टक्के लागला असून यावर्षीही विद्यालयातील विद्यार्थ्यांनी निकालाची यशस्वी परंपरा कायम राखण्यात यश मिळवले आहे. जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या माध्यमिक शालांत परीक्षेच्या निकालात यावर्षी शाळेचा निकाल एकूण ९७% लागला असून या निकालामध्ये २३ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह , २१विद्यार्थी प्रथम श्रेणीत, द्वितीय श्रेणीत ८ तर तृतीय श्रेणीत १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संपूर्ण विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान कु नंदिनी योगीराज पांडे हिने ९७ टक्के गुण प्राप्त करून पटकावला आहे . शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या गणित , इंग्रजी , विज्ञान या विषयाच्या जादा तासिका, साप्ताहिक, मासिक व सराव परीक्षांचा परिणाम म्हणून या निकालाचे यश विद्यार्थ्यांना संपादन करता आले असल्याचे मुख्याध्यापक विनायक मुंजे यांनी सांगितले आहे.

गेल्या पंचवीस वर्षापासून जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय आपल्या निकालाची यशस्वी परंपरा विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन जोपासत आहे. इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचे संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक व्ही .बी.चव्हाण, डॉ. डी एच. थोरात, प्राचार्य बी.आय. खडकभावी तसेच सर्व शाळेचे मुख्याध्यापक विनायक मुंजे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत .

## चि. प्रणव प्रमोद गिराम याचे सुयश

**परळी** (प्रतिनिधी) :-



माणिक नगर येथील मूळचे रहिवाशी असलेले प्रमोद बालाजी गिराम यांचा मुलगा चि. प्रणव याने अभिनव विद्यालय इंग्लिश मीडियम हायस्कूल पुणे येथून इयत्ता १० वी मध्ये ७३.४०% गुण मिळवून सुयश मिळवले आहे. चि. प्रणव याने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. या यशासाठी पालकांचे व शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले असे त्याने सांगितले. चि. प्रणव याला पुढील शिक्षणासाठी मुख्याध्यापक व शिक्षक वृंदानी शुभेच्छा दिल्या.

## शारदा इंग्लिश स्कूल केजचा इयत्ता दहावीचा सीबीएसई बोर्डपरीक्षेचा निकाल ९८.०५ टक्के

**केज** (प्रतिनिधी) :-



शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेचा मार्च २०२५ मध्ये झालेल्या इयत्तादहावी सीबीएसई बोर्ड परीक्षेचा निकाल दिनांक १३ मे २०२५ रोजीदुपारी एक वाजता जाहीर झाला.शाळेने उज्वल यशाची परंपरा कायम राखली असून शाळेचानिकाल ९८.०५

टक्के लागलेला आहे. केज शहरामधील सीबीएसई बोर्डाची मान्यता असलेली ही एकमेव शाळा आहे.या शाळेने सातत्याने शाळेचे संस्थेचे, तालुक्याचे,जिल्ह्याचे नाव उंचावण्याचे काम केलेले आहे.चालू वर्षी ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी अटकेपार झेंडा रोवला आहे.प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी शाळेचा निकाल उत्कृष्ट लागला असून विद्यार्थी व विद्यार्थिनींनी अतिशय चांगले गुण प्राप्त केले आहेत.शाळेमध्ये सर्व प्रथम येण्याचा मान कु राऊत अरुषा ९६% तर सर्व द्वितीय कु तिवारी जागृती ९५% तर तृतीय स्थान जाधव कृष्णा ९४ % याने पटकावले आहे.

शाळेमध्ये ९०% च्या पुढे गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १४ तर ८० ते ९०% च्या मध्ये ४६ विद्यार्थी आहेत.तसेच ७० ते ८०% मध्ये ५३ विद्यार्थी आहेत तर प्रथम श्रेणी मध्ये २५ व उत्तीर्णश्रेणी मध्ये १४विद्यार्थी आहेत.इतक्या मोठ्याप्रमाणात यश मिळवले असल्याने शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव विद्यार्थ्यांवर होत आहे.वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना श्री.रमेशराव आडसकर यांनी हे यश विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, शिक्षकांच्या विद्यार्थ्या प्रती असलेल्या समर्पणाचे वपालकांच्या त्यागाचे असल्याचे मत मांडले.तसेचविद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाट चालीस हार्दिकशुभेच्छा दिल्या.शाळेच्या मार्गदर्शिका श्रीमती अर्चनाताई आडसकर यांच्या नियोजनाचे, मार्गदर्शनाचे हे यश असल्याचे मत शाळेचे प्राचार्य मिश्रा एस.एम व उपप्राचार्य सुरजसनी यांनी व्यक्त केले.तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.



शेख अब्दुल करीम, एस.पी.राय (पूर्व कमिश्नर दिल्ली)आय.ए. एस. अधिकारी मार्गदर्शन करताना दिसत असुन तिसऱ्या फोटोत अनीस सैफी, दिलदार बेग, राज बलवान सिंह सोलंकी, गुरु मसहाराज रामदास जी, एस.एम.हबीबुल्लाह, डॉ.बिलाल शबगा, शेख अब्दुल करीम, डॉ.डेविड फिलिप्स हे दिसत आहेत तर चौथ्या फोटोत शाहबाज़ आलम, दिलदार बेग राज बलवान सिंह सोलंकी, डॉ.इक़बाल गौरी, डॉ.बिलाल शाबगा, शेख अब्दुल करीम व नावेद खान दिसत आहेत.

## बिलाल उर्दू हाईस्कूल तालुक्यात सर्वप्रथम

**परळी** (प्रतिनिधी) :-

दिनांक १३ मे २०२५ रोजी माध्यामिक शालांत प्रमाणपत्र या परिक्षेचा निकाल लागला त्यात शाळेतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले यामध्ये कुमारी अर्शिया सुलतान अली शेख या विध्यार्थी निने ९३.२०% घेऊन तालूक्यात उर्दू माध्यमातून प्रथम येण्याचा मान पटकावला त्याच बरोबर निदाखान शेर खान ९२.४० % घेऊन द्वितिय येण्याचा मान मिळवला शाळेतील विद्यार्थ्यांनी खूपच चांगले गुण मिळवून शाळेचे नाव लौकिक केले त्यामध्ये मारिया कुलसुम शहेबाज खान ८६.६०% घेऊन शाळेतून तिसरा क्रमांक मिळवाला त्याच बरोबर शेख अयमन रिदा मुदस्सर नदीम ८३.०० % घेऊन शाळेतून चौथा क्रमांक पटकावला त्याच बरोबर अलफिया माहिन अखिल शेख ७७.४०% घेऊन शाळेतून पाचवा क्रमांक मिळवला. यासर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे अध्यक्ष शेख अब्दुल करीम साहेब, सचिव शेख तस्नीम फातेमा बाजी, कोषाध्यक्ष शेख मुदस्सर नदीम, शाळेचे मुख्याध्यापक शेख सुलतानअली व शाळेचे सर्व कर्मचारी यांनी विदयार्थ्यांचे मन:पुर्वक अभिनंदन केले व पुढील शिक्षणासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या

## दहावीच्या निकालात न्यू हायस्कूल शाळेची परळी तालुक्यात आघाडी

**परळी** (प्रतिनिधी) :-

येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या न्यू हायस्कूल शाळेचा गेल्या मार्च मध्ये झालेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल ९८.४० टक्के लागला असून १०९ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यावर गुण घेतले आहेत. त्यात ३५ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के गुण मिळवले आहेत.

९८.४० टक्के गुण घेवून पंकज विलास शिंदे शाळेतून पहिला आला असून शितल अंगदराव भंडारे व शुभम गोविंद मुंडे, मंथन लक्ष्मीनारायण मंत्री हे विद्यार्थी ९८ टक्के गुण घेवून शाळेतून दुसरे तर श्रृती संभाजीराव सोळंके ९७.८० टक्के घेवून शाळेतून तिसरी आली आहे. या परीक्षेला शाळेतून ३७६ विद्यार्थी बसले होते.



त्यापैकी ३७० उत्तीर्ण झाले असून चार विद्यार्थी परीक्षेला गैरहजर राहिले होते तर केवळ २ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहे. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी विशेष प्राविण्यासह २८२, प्रथम श्रेणीत ५८, द्वितीय श्रेणीत २६ आणि तृतीय श्रेणीत ४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांत १७ विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. न्यू हायस्कूल शाळेचा या परीक्षेचा निकाल ९८.४० टक्के लागला आहे. हा निकाल परळी तालुक्यात मराठी माध्यमाच्या शाळेत उल्लेखनिय आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आ.प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आ.सतीशभाऊ चव्हाण व सर्व कार्यकारिणीचे संचालक तसेच शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके व इतर सर्व सदस्य, मुख्याध्यापक एस.पी.देशमुख, पर्यवेक्षक बालासाहेब राठोड, उच्च माध्यमिक विभागाचे प्रभारी सुनील लोमटे यांच्यासह शाळेतील शिक्षकवृंदांनी केले आहे.

दरम्यान, निकाल लागल्यानंतर मंगळवारी (दि.१३) दुपारी गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा शाळेत पेढे व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य व माजी नगराध्यक्ष बाळासाहेब देशमुख, दिलीपराव देशमुख, ज्येष्ठ शिक्षक तानाजी शास्त्री, रामकिसन बोंबले, भिमसेन गडदे, डी.एम.शिंदे, कानीफनाथ सोळंके, संजय वानखेडे यांच्यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. शाळेतील सर्व शिक्षकांचे परिश्रम, पालकांचे सहकार्य, संस्थेचे पदाधिकारी व संचालक यांचे मार्गदर्शन यामुळेच शाळेच्या निकालाची परंपरा कायम ठेवून आम्ही हे यश मिळवू शकलो असे मुख्याध्यापक एस.पी.देशमुख यांनी सांगितले.

## १० वी परिक्षेत ९०.४०% गुण; चि.रोहन कैलास डुमणेचे घवघवीत यश

**परळी** (प्रतिनिधी) :-

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात दहावीच्या



परीक्षेत चि. रोहन कैलास डुमणे याने ९०.४०% गुण घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

परळी वैजनाथ येथील विद्यावर्धिनी विद्यालयातून चि.रोहन डुमणे याने दहावीची परिक्षा दिली.माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत त्याने ९०.४० टक्के गुण संपादन करून घवघवीत यश प्राप्त केले आहे.रणधुमाळीचे संपादक कैलास डुमणे यांचा रोहन मुलगा आहे. त्याने मिळवलेल्या या घवघवीत यशबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षकवृंद, परळीतील पत्रकार बांधव आदींनी त्याचे अभिनंदन केले आहे.

## नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अल्पसंख्यांक शिक्षा सेमिनारचे २० मे रोजी आयोजन



### मोठ्या संख्येने उपस्थित रहावे-संयोजक हाजी शेख अब्दुल करीम

नवी दिल्ली (प्रतिनिधी):- (पालम गांव -कार्यालय ) हमारा नारा भाईचारा मिशन च्या वतीने येत्या २० मे, मंगलवार रोजी डॉ.अम्बेडकर इनटरनेशनल सेंटर, १५, जनपथ, नवी दिल्ली येथे मा.ना. श्री नितिन गडकरी (राष्ट्रीय महामार्ग व परिवहन मंत्री, भारत सरकार ) यांच्या प्रमुख मार्गदर्शनात स्व.आरिफ बेग स्मृतितार्थ अल्प संख्यक समजात शिक्षा पर परिचर्चा या विषय वर राष्ट्रीय स्तरावर भव्य सेमिनार चे आयोजन करण्यात येणार आहे. पालम गांव (नवी दिल्ली) येथे भाईचारा मिशन कार्यालयात पूर्व तैयारी सन्दर्भात विशेष बैठकचे आयोजन करण्यात आले.बैठक सुरु करण्या पूर्वी अतिरेकयांच्या भयाड हल्यात शहीद झालेल्या शहीदन्ना सर्व प्रथम दोंन मिनट उभे राहून श्रद्धांजलि अर्पित करण्यात आली.

डॉ.अम्बेडकर इंएरनेशनल सेंटर, १५, जनपथ, नवी दिल्ली संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमांस उत्तर प्रदेश,हरयाणा,राजस्थान,पंजाब, मध्यप्रदेश,गुजरात व महाराष्ट्र सह देश भरातून १००० च्या वर प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. या प्रसंगी ऑपरेशन सिन्दूर मध्ये यशस्वी नेतृत्व करून देशचे गौरव वाढव्वणाऱ्या कर्नल सोफिया कुरैशी व विंग कमांडर इयोमिका सींग यांचे टाळ्या च्या गजरात अभिनन्दन करण्यात आले. गुरु महाराज रामदास जी यांच्या अध्यक्षतेत संपन्न बैठकित या सेमिनार चे संयोजक शैख अब्दुल करीम यांनी कार्यक्रम यशस्वी करण्या साठी जबाबदारयांचे वाटप केले व सर्व.सम्मतीं नें आयोजन समितिचे अध्यक्ष म्हणून श्री राज बलवान सिंह सोलंकी यांचीनिवड करण्यात आली व प्रबंधन समितिच्या अध्यक्ष पदा चे दायित्व डॉ इक़बाल गौरी यांचे वर सोपविण्यात आले. बैठकीचे संचालन डॉ बिलाल शबगा यांनी अत्यंत सुन्दर पणे केले.मिशन चे मुख्य संरक्षक श्री यस. पी.राय यांनी मार्गदर्शन करताना अल्पसंख्यक मुस्लिम समजत शिक्षणा च्या प्रसार व प्रचार करण्याची अत्यंत गरज व आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. गुरु रामदास जी महाराज यांच्या अध्यक्षीय समरोपच्या भाषणा नें बैठकीची सांगता झाली.बैठकित श्री दिलदार हुसैन बेग ( चेयरमैन कोऑर्डिनेशन कमेटी ),चौधरी उमेदसिंग नम्बरदार,एडवोकेट आर.बी.सिंग,अशोक लोचब,श्री सोनी जी,शाहबाज़ आलम, नावेद खान,डॉ ए. एम. लाल,डॉ डेविड फिलिपु,बदन सिंग,समरीन सबा सय्यद,नदीम अहमद,मोहम्मद इलियास इदरीसी,अनीस सैफी,मोहम्मद रिज़वान शबगा आणि विशेष कोलकाता हून आलेले एस.एम.हैबिबुल्लाह आदि उपस्थित होते.

## संत बाळूदेव महाराज विद्यालय उज्वल यशाची परंपरा कायम

पाटोदा (प्रतिनिधी)

येथील आनंद चरिटेबल संस्था आष्टी संचलित.संत बाळूदेव महाराज विद्यालयाचा दहावी बोर्ड २०२५ परीक्षेत नेहमी प्रमाणे उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.दहावीचा शंभर टक्के निकाल लागला असून सर्व स्तरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे कौतुक होत आहे. या वर्षी शाळेमध्ये सागर किसन मामडगे : ८६.८० टक्के गुण घेऊन प्रथम क्रमांक पटकावला तर मोरे बाजीराव विष्णू याने ८३.८० टक्के घेऊन दुसरा व वाघमारे रितेश गौतम ७३.२० टक्के घेऊन तृतीय येण्याचा बहुमान पटकावला आहे.तसेच सर्वच उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे माजी आमदार तथा आनंद चॅरिटेबल संस्था आष्टीचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार

## ग्रामीण पोलिसांनी अवैध रेती वाहतूक करणारा हायवा टिप्पर पकडला

**नांदेड** (प्रतिनिधी) :-

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पेट्रोलिंग करताना बोंढर बायपास जुन्या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अवैद्य रेतीने भरून वाहतूक करणारा हयवा टिप्पर ग्रामीण पोलीस पथकाल दिसला त्यांनी त्याची चौकशी केली असता त्यांच्याकडे रॉयल्टी पावती मिळाली नाही ही अवैद्य रेती चोरी असल्याचे संबंधित अधिकाऱ्याला समजतात त्यांनी हायवा टिप्पर जप्त करून चालकावर गुन्हा दाखल करून हायवा टिप्पर पोलीस स्थानकामध्ये जप्त केला आहे



सविस्तर वृत्त असे की ग्रामीण पोलीस स्थानकाचे कर्मचारी अधिकारी पेट्रोलिंग करीत असताना ठाण्याच्या हद्दीमधील अवैध रेती चोरी करणाऱ्या वर पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी आदेश देऊन चोरीला आळा घालण्यासाठी आदेश दिले आहेत त्यावरून ग्रामीण पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये अवैद्य रेती चोरी करणाऱ्या वाळू चोरावर गुन्हे दाखल करण्याचे संबंधित पोलीस अधिकारी कर्मचारी याना आदेश दिले त्यावरून बोढार बायपास जवळ पेट्रोलिंग करताना एक हयवा टिप्पर एम एस २६ बी ई ९७ २७ मध्ये विना परवाना अवैद्यरित्या रेती गोण खनिज ची चोरटी वाहतूक करीत असताना मिळून आला सदर ठिकाणावरून एक टिप्पर व पाच ब्रास रेती असा एकूण ३०.२५०००रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चाटे हे करीत आहेत.

न्याय टाईम्स हे पत्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालकिशन श्रीरामजी सोनी यांनी मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे, मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, जलालपुर, परळी-वैजनाथ, तालुका.परळी-वैजनाथ, जिल्हा.बीड (महाराष्ट्र) येथे छापून प्लॉट न-४, इंडस्ट्रीयल एरिया, परळी-वैजनाथ, पिन-४३१५१५, जिल्हा.बीड (महाराष्ट्र). उपसंपादक : अजित बालकिशन सोनी, कायदेशीर सल्लागार : श्रीनिवास श्रीधरराव जोशी. (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) RNI-MAHMAR/2013/54911 P.R. No. L/123/RNP/BEED/2021-23